<u>जाहिर नोटीस(१)</u>

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेली पिंपरीचिंचवडमहानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवासा सदर मिळकतीच्या हितसंबंधितियांनी पिंपरीचिंचवडमहानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, ईजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरीचिंचवडमहानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरीचिंचवडमहानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल, व जमीन महापालिका ताब्यात घेतील. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

<u>परिशिष्ट –१</u>

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी मुळशी, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. १२५/१/१/३ पैकी मधील श्री. संजय नामदेव झोडगे व श्री. रमेश नामदेव झोडगे व श्री. कालिदास नामदेव झोडगे यांच्या मालकीच्या मिळकतीतील नविन हद्दीच्या मंजुर विकास योजनेतील २४.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित अंदाजे क्षेत्र ६५.०० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा:-

उत्तरेस - लागु स.नं. १२५ पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत

दक्षिणेस - लागु स.नं. १२७ पैकीची मिळकत.

पूर्वेस - लागु रस्ता.

पश्चिमेस - लागु स.नं. १२५ पैकीची मिळकत.

<u>परिशिष्ट –२</u>

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी मुळशी, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रावेत येथील स.नं. १३९/२/२/६/१ पै मधील श्री. प्रभुदास प्रेमानंद श्रीसुंदर यांचे तर्फे कुलमुखत्यार पत्रधारक श्री.प्रमोद रघुनाथ ताम्हणकर, श्री मंगेश शांताराम कदम व श्री. प्रविण बबनराव केमसे यांच्या मालकीच्या

मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजुर विकास योजनेतील १८.०० मी. रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र १००.०० चौ.मी. क्षेत्र जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा:- १८.०० मी रस्ता बाधित क्षेत्र १००.०० चौ.मी

| | |
|---|---|
| उत्तरेस - | स.नं. १३९ पै मिळकत |
| पूर्वेस - | स.नं. १३९ पै मिळकत |
| दक्षिणेस - | स.नं. १३६ पैकीची मिळकत. |
| पश्चिमेस - | स.नं. १३९ पै मिळकत |

जाहीर नोटीस (२)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खलीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कोणत्याही वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी वाघेरे येथील सि.स. नं ११६२,११६२/१ मधील मे. एस.एस.डी. इन्फ्रास्टक्चर तर्फे प्रोप्रा. श्री विजय किसनचंद मतानी यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या क्षेत्राच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ९.०० मी. रूंद रस्ता व मंजूर विकास योजने व्यतिरिक्त मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित २० फुट रूंद रस्ता या प्रयोजनाने बाधित सि.स.नं. ११६२ पै मधील १९४.६३ चौ.मी. व सि.स.नं. ११६२/१ पै मधील २९३.५० चौ.मी असे एकूण ४८८.१३ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे पिंपरी वाघेरे सि. स नं ११६२,११६२/१,९ मी. रूंद रस्ता व मंजूर विकास योजनेव्यतिरिक्त मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित २० फुट रूंद रस्ता : (बाधित क्षेत्र ४८८.१३ चौ.मी )

उत्तरेस :- लागू गट सि. स. नं. ११६३ ची मिळकत

पुर्वेस :- लागू स. नं. २२७ ची मिळकत

दक्षिणेस :- लागू रस्ता

पश्चिमेस :- लागू सि. स. नं. ११६२ पै, ११६२/१ पै ची उर्वरित मिळकत

उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे ४११०१८

जाहिरात क्र. २४५
दिनांक ३०/७/१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.